

एका माणसाला किती जमीन लागते?

लियो टॉलस्टॉय



पखोम या हावरट शेतकर्‍याची ही अद्भुत, मुलांसाठी संक्षिप्त कथा लिओ टॉलस्टॉयनं १८८६ मध्ये लिहिली होती. एका दिवसात जितका तो चालेल तितकी जमीन मिळेल या आशेवर जास्त जमीन प्राप्त करण्याच्या नादात, पखोम दिवसभर बश्किरच्या जमिनीवर धावतो.

एका माणसाला किती जमीन लागते? या कथेला टॉलस्टॉयच्या लेखनाच्या अप्रतिम शैलीला उत्तम रेखाटनांची जोड मिळाली आहे. त्यामुळे पखोमचा प्रवास वाचकांना रशियन संस्कृतीचं वैविध्यही दाखवून देतो.





एका माणसाला किती जमीन लागते?

लियो टॉलस्टॉय

चित्र : ऐलेना एबेसिनोवा

मराठी : नीलांबरी जोशी




कोणे एके काळी रशियात दोन बहिणी रहात होत्या. थोरल्या बहिणीचं शहरातल्या एका व्यापार्‍याशी लग्न झालं होतं. धाकट्या बहिणीचं खेड्यातल्या एका शेतकर्‍याशी लग्न झालं होतं. थोरली बहिण धाकट्या बहिणीला भेटायला गेली तेव्हा आपला तोरा मिरवत म्हणाली, “शहरातल्या माझ्या आयुष्यात मी सुखात लोळते आहे. तुझ्यापेक्षा कितीतरी ऐषोआराम आहे. मी एका प्रशस्त, भपकेबाज घरात रहाते. सगळं कसं नीटनेटकं आहे. मला हवं ते खायलाप्यायला उपलब्ध आहे. मी हवं तिथे फिरायला आणि हवी ती नाटकं पहायला जाऊ शकते.”






18
Большой
домъ
35
ТЕАТР
ВОДА



धाकट्या बहिणीनं खेड्यातल्या आयुष्याची भलामण केली. “इथलं आयुष्य तुझ्या आयुष्याइतकं देखणं आणि स्वच्छ नसेल. आम्हाला कष्ट करावे लागतात. पण आमचं आयुष्य शांत आणि सुरक्षित आहे. जमीन आम्हाला खायला मुबलक धान्य देते, तुमची संपत्ती उद्या नाहीशी होऊ शकते. शहरात अनेक प्रलोभनं आहेत. तुझा नवरा दारुडा किंवा जुगारी होऊ शकतो. त्याला एखादी प्रेमिका मिळू शकते. माझ्या नवऱ्याच्या मनाला असे विचार शिवणारही नाहीत. त्याला खूप श्रम करावे लागतात.”

पखोम, धाकट्या बहिणीवा नवरा शेकोटीपाशी निजला होता. आपल्या बायकोचं बोलणं त्यानं ऐकलं आणि त्याच्या मनात विचार आला, “तिचं बरोबर आहे. तिनं उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा आहे. मात्र एकच गोष्ट लाजिरवाणी आहे. आपल्याकडे फारच थोडी जमीन आहे. जरा जास्त जमीन असती तर मी कशालाच आणि कोणालाच घाबरलो नसतो.”



त्या गावची जमीनदार मालकीण शेतकर्‍यांशी कायम सौहार्दपूर्ण वागायची. पण तिनं एक मॅनेजर नेमला, त्यानं सगळ्यांसाठी समस्या उभ्या केल्या. जर एखादी गाय जमीनदारणीच्या शेतात चरायला आली तर मॅनेजर दंड आकारायचा. पखोमला असा दंड अनेकदा भरावा लागला होता. त्यानं साठवलेले पैसे असे पटापट संपत चालले होते. लवकरच कुटुंबियांशी रागीटपणे आणि अस्वस्थपणे वागायला लागला.
योगायोगानं जमीनदारणीनं तिची मालमत्ता शेतकर्‍यांना विकली. आपल्या शेजार्‍यानं पन्नास एकर जमीन घेतली हे पाहून पखोमला मत्सर वाटला. तो बायकोला म्हणाला, “सगळे शेजारी जमीन विकत घेत आहेत. आपणही थोडी जमीन विकत घ्यायला हवी.”
मग पखोम आणि त्याची बायको यांनी शहरातल्या आपल्या मेव्हण्याकडून पैसे उसने घेतले. पखोमच्या मुलानं इतर शेतकर्‍यांकडे मजुरी करायला सुरुवात केली. मग पखोमला बर्चची झाडं असलेली पंचवीस एकर जमीनच विकत घेता आली.

पखोमचा आनंद गगनात मावेना. आता तो स्वत:च्या मर्जीचा मालक होता. शेतात सुगीच्या हंगामात पिक डोलत होतं. भरपूर धान्य उगवल्यानं त्याला बाजारात चांगला नफाही मिळाला. तो आपली सगळी कर्जं फेडू शकला. घरात शांतता आणि आनंद नांदायला लागला.









पण हे फार काळ टिकलं नाही. शेजार्‍यांच्या गायी त्याच्या शेतात येऊन पोटभर चरुन जाच्या. पखोमनं त्या शेतकर्‍यांनी आपल्या गुरांकडे लक्ष द्यायची विनंती केली. पण त्यांनी ऐकलं नाही. मग त्यानं आपल्या दोन शेजार्‍यांना दंड भरण्यासाठी कोर्टात खेचलं. त्यांना राग आला आणि पखोमची जमीन त्यांनी जाणूनबुजून उध्वस्त केली. एके दिवशी सकाळी, आपली बर्चच्या झाडं साली काढलेल्या अवस्थेत जमीनदोस्त झालेली पखोमला दिसली. तो एकाचवेळी हताश झाला आणि चिडला.




आपला शेजारी सायमननं हे केलं असा त्याला संशय होता. त्यानं सायमनला कोर्टात खेचलं. पण पखोमकडे पुरावा नव्हता त्यामुळे न्यायाधीशांनी सायमनला सोडून दिलं. पखोम मग न्यायाधीशांशीच वाद घालायला लागला. लवकरच गावातले सगळे पखोमचा तिरस्कार करायला लागले. तिथे रहाणं पखोमला दिवसेंदिवस मुश्किल होत गेलं.





एका संध्याकाळी, एक वाटसरु रात्रीपुरता आश्रय शोधत अला. पखोमनं त्याचं आगतस्वागत केलं. रात्रीच्या जेवणाच्या वेळी तो वाटसरु म्हणाला, “मी व्होल्गाच्या खालच्या भागातून आलो आहे. तिथे मी काम करत होतो. तिथे खूप सुपीक जमीन आहे. ती तुला स्वस्तात खरेदी करता येईल. माझ्या गावातले अनेक लोक तिथे स्थायिक झाले आहेत आणि श्रीमंत झाले आहेत.” त्यावर पखोमनं विचार केला, व्होल्गात जर इतकं सुख असेल तर मी इथे कशाला त्रास सहन करत बसू?








शिशिरऋतूमध्ये पखोम निघाला. त्या वाटसरुचं म्हणणं कितपत खरं आहे ते त्याला आजमावायचं होतं. त्या वाटसरुचं म्हणणं खरं निघालं. मग पखोमनं आपलं घर, जमीन, शेत सगळं विकून चांगला नफा कमवला. वसंतऋतूत तो कुटुंबाबरोबर व्होल्गात गेला.




पखोम आणि त्याच्या कुटुंबियांचं तिथल्या लोकांनी आनंदानं स्वागत केलं. पखोमनं गावातल्या वयोवृध्दांना उत्तम खाद्यपदार्थ आणि पेयं भेट दिली. त्याबदल्यात त्यांनी त्याला कागदपत्रं मिळवून द्यायला मदत केली. पखोमच्या कुटुंबात पाचजण असल्यानं त्याला १२५ एकर जमिन मिळाली. ती त्याच्याकडे आधी असलेल्या जमिनीच्या पाचपट जास्त होती. तो लगेचच तिथे स्थिरावायला लागला. त्यानं गुरं विकत घेतली. जमीन नांगरली आणि सगळंच कसं नीट चाललं होतं. पण तरीही काही काळानंतर त्याला परत असमाधानी वाटायला लागलं.

पखोमची शेती विखुरलेली होती. कापणीनंतर मुबलक धान्य मिळवण्यासाठी त्याला दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी पेरणी करावी लागत असे. ते जरा कठीण जायचं. श्रीमंत शेतकर्‍यांची घरं आपल्या शेतीच्या मध्यभागी आहेत हे त्यानं हेरलं. मी जर अजून जमीन घेतली तर मीही तसंच घर बांधू शकेन असा त्यानं विचार केला.



दरम्यान त्याला एका शेतकर्‍याची परिस्थिती बिकट असल्याचं कळलं. पखोमनं त्याच्याकडून १२०० एकर जमीन १०० रुबल्सला विकत घ्यायचा घाट घातला. पण तो व्यवहार व्हायच्या आत एक व्यापारी त्या रात्रीपुरता आश्रय मागायला पखोमकडे आला.



तो व्यापारी पखोमला म्हणाला, “मी खूप दुरुन बश्किर भागातून आलो आहे. तिथले लोक खूप सज्जन आहेत. त्यांच्याकडे चिक्कार जमीन आहे, ज्यावरुन चालत जायला एक वर्ष लागेल. मी त्यांना भेटवस्तू दिल्या आणि त्यांनी मला १२००० एकर जमीन १००० रुबल्सना दिली. ती चांगली, सुपीक जमीन आहे आणि तिथे जवळून नदी वहाते”. पखोमनं स्वत:शी विचार केला, मी १२०० एकरांसाठी १००० रुबल्स का द्यावेत? तेवढ्या पैशांमध्ये मला दहापट जास्त जमीन मिळते आहे.





पखोमनं मग बश्किर भाग कुठे आहे ते विचारलं. त्याला ताबडतोब तिकडे जायचं होतं. मग त्यानं शेताची राखण करायला बायकोला सांगितलं. एका नोकराला सोबत घेऊन शहरात जाऊन भेटवस्तू विकत घेतल्या आणि पखोमच्या दिशेनं निघाला. बश्किरला पोचायला पखोम आणि त्याचा नोकर यांना बरेच दिवस लागले. पण तिथे पोचल्यावर तिथल्या लोकांनी त्यांचं स्वागतच केलं. बश्किर हे आनंदी, मनमोकळे लोक होते. ते जमिनी नांगरत नसत. त्यांच्या गायीगुरांना सगळीकडे चरायला मुक्त प्रवेश होता. बश्किर लोकांनी पखोमची एका तंबूत रहाण्याची सोय केली. तिथे उंची गाद्यागिरद्या होत्या.

त्यांनी पखोमला प्यायला उंची पेयं दिली आणि खायला भरपूर चीज, मांस दिलं. मग पखोमनं त्यांना भेटवस्तू दिल्या. बश्किरना त्या घेऊन आनंद झाला. ते म्हणाले, “तू किती दानशूर आहेस. आम्ही तुझ्यासाठी काय करु?”

बश्किर लोकांनी याला सहमती दर्शवली आणि ते म्हणाले, “धन्यवाद. तुला जितकी जमीन हवी असेल तितकी आम्ही देऊ.

पण मग ते आपापसात वादविवाद करायला लागले. एक गट म्हणाला, “आपल्या वाडवडिलांना विचारल्याशिवाय आपण जमीन देऊ शकत नाही.” दुसरा गट म्हणाला, “त्यात काय. आपण देऊ शकतो.”





बश्किर लोकांचा वाद चालू असताना एक फर कॅप घातलेला माणूस तिथे आला. तो वयोवृध्द होता. त्याला या वादाचं कारण जाणून घ्यायचं होतं.

पखोमनं त्याला एक सुरेख कफ्तान आणि पाच पौंड चहा भेट दिला. तो वृध्द माणूस पखोमला म्हणाला, “तुला जर जमीन हवी असेल, तर हवी तितकी घे. आमच्याकडे भरपूर जमीन आहे. पखोमनं त्याचे आभार मानले आणि किंमत विचारली.”






“आमच्याकडे एकच किंमत आहे.” तो वृध्द म्हणाला. “प्रतिदिवस १००० रुबल्स. पखोमला याचा अर्थ कळला नाही. मग त्या वृध्दानं समजावून सांगितलं, तू एका दिवसात जितका चालशील तितकी जमीन तुझी. त्याची किंमत १००० रुबल्स.”

आश्चर्यचकित होऊन पखोम म्हणाला, “मी दिवसभरात खूप जास्त जमिनीवर चालू शकेन.”

तो वृध्द हसला आणि म्हणाला, “हो. तितकी जमीन तुझी. पण संध्याकाळी तू जिथून सुरुवात करशील तिथे पोचायला हवं. तसं झालं नाही, तर तुला जमीन मिळणार नाही. पण पैसे मात्र तितकेच द्यावे लागतील.” पखोमनं तो सौदा मान्य केला. दुसऱ्या दिवशी सकाळी पखोम जमिनीवर चालायला सुरुवात करेल असं ठरलं.







त्या रात्री पखोम बिछान्यावर पहुडला, पण त्याला झोप लागली नाही. उन्हाळ्याच्या मोठ्या दिवसात तो ५० मैल सहज चालू शकेल असं गणित तो करत होता. मग त्या जमिनीचं काय काय करायचं याचे इमले तो मनात बांधायला लागला. जरा रेताड जमीन भाड्यानं देऊन सुपीक जमीन स्वत:कडे ठेवायची. तो योक विकत घ्यायचे आणि दोन नवीन नोकर ठेवायचे वगैरे विचार तो करत होता. पहाट होण्यापूर्वी तो झोपी गेला आणि त्याला स्वप्न पडलं. स्वप्नात तो वृध्द बश्किर तंबूबाहेर बसून मोठ्यानं हसत होता.

पखोम त्याला म्हणाला, “तू का हसतो आहेस?” मग अचानक तिथे तो व्यापारी आला. पखोमनं त्याला विचारलं, “तू इतक्या दूरवर कसा आलास?”

मग अचानक त्याला व्होल्गामधला शेतकरी दिसला. अचानक पखोमला जमिनीवर एक मृतदेह दिसला. तो त्याचाच मृतदेह होता. तो अचानक जागा झाला आणि ते स्वप्न मनातून झटकायचा प्रयत्न करायला लागला.


त्यानं नोकराला आणि बश्किर लोकांना हाक मारुन उठवलं आणि म्हणाला, “चला निघू या. माझ्या जमिनीवर चालायला सुरुवात करायला हवी. लवकरच सूर्य उगवेल.”






बश्किर पखोमबरोबर एका टेकडीवर गेले. बाजूच्या पसरलेल्या जमिनीकडे पाहून तो वृध्द पखोमला म्हणाला, “ही सगळी जमीन आमची आहे. तू तुझ्यासाठी एक तुकडा निवड. पखोमचे डोळे मोहानं चमकले. त्या वृध्दानं आपली फर कॅप जमिनीवर ठेवली आणि म्हणाला, ही टोपी ही तुझी खूण आहे. इथून तू चालायला लाग आणि इथेच तू परत यायला हवंस. तू सूर्यास्तापर्यंत आला नाहीस तर सौदा हरलास. तू परत आलास तर तू चालून आला असशील तितकी जमीन तुला मिळेल.”

पखोमनं त्या टोपीवर आपले पैसे ठेवले. अंगावरचा कोट काढला आणि सूर्याच्या पहिल्या किरणाची वाट पहायला लागला.






लवकरच सूर्यप्रकाश दिसला आणि पखोमनं पूर्वेकडे चालायला सुरुवात केली. लांबलचक ढांगा टाकत खांद्यावरच्या कुदळीनं तो जमिनीवर खुणा करत चालला होता.



काही तासांनंतर पखोम स्वत:शी म्हणाला, “आत्ता परत फिरणं फार लवकर होईल. इथली जमीन खूप चांगली आहे. मी जितकं चालू शकेन तितकी सुपीक जमीन मला मिळेल”. लोभानं तो चालतच राहिला. तो घामानं थबथबला होता. जिथून तो चालत आला तिकडे पाहिलं तर ती टेकडी मुंग्यांच्या वारुळाइतकी लहान दिसत होती.



चौकोनाच्या दुसऱ्या बाजूवर आता तो चालत होता.आता त्याला खरं तर परत फिरायला हवं होतं. तो दमला होता. सूर्य आग ओकत होता. पखोमनं थोडंसंचं खाल्लं आणि पाणी प्यायलं. “मी जर विश्रांती घ्यायला थांबलो तर मला झोप लागेल‘ असा विचार करुन तो चालायला लागला.





जमिनीच्या दुसऱ्या बाजूवरही तो खूपसं अंतर चालला. ज्या क्षणी परत फिरावंसं वाटे, त्या क्षणी त्याला एखादं सुंदर ठिकाण मोह पाडत होतं किंवा हिरवंगार कुरण दिसत होतं. शेवटी तो दोन बाजू ओलांडून तिसऱ्या बाजूच्या जमिनीकडे पोचला. पहिल्या दोन बाजूंना तो लांबवर चालला होता. मग त्यानं भराभर पावलं टाकायला सुरुवात केली. तिसरी बाजू छोटी करणं अपेक्षित होतं.





आता सूर्य मावळतीला झुकला होता. पोखम अस्वस्थ झाला. आपण सुरुवात केली तिथे पोचलो नाही तर काय होईल? तो आता चौकोनी जमिनीच्या चौथ्या बाजूवर चालत होता. फरची टोपी आणि तो यांच्यात १५ मैलांचं अंतर होतं. तो टेकडीच्या दिशेनं पळायला लागला.


पखोम पळत होता.. पळत होता. टोपी अजूनही दूर होती आणि तो थकला होता. त्याचे पाय दुखत होते, रक्ताळले होते. “मी घाई करायला हवी. मी खूप पुढे गेलो. पण मला जर उशीर झाला तर जमीन आणि पैसे दोन्ही गमावून बसेन.”



शेवटचा प्रयत्न करुन तो अजून जोरात धावायला लागला. आता तो धापा टाकत होता. त्याच्या हृदयाचे ठोके जलद झाले होते आणि घशाला कोरड पडली होती. सूर्य अस्ताकडे झुकला होता. अखेरीस तो स्वत:शी कण्हत उद्गारला, “मी परत पोचू शकणार नाही. सगळं संपलंय आणि मी संपलोय.”



तेवढ्यात त्यानं बश्किरच्या हाका ऐकल्या. ते त्याला हात करुन चालायला सांगत होते. टेकडीच्या वर सूर्य अजून होता. शेवटी उरलीसुरली शक्ती एकवटून पखोम टेकडीकडे निघाला. तो वृध्द तिथे बसला होता आणि खरोखरच मोठ्यानं हसत होता. पखोम कण्हला. थकून तो कोसळला. त्याचे हात कसेबसे टोपीपर्यंत पोचले.









तो वृध्द ओरडला, “शाब्बास..! तू खूप सारी जमीन मिळवलीस.” पण पखोमला ते ऐकू आलंच नाही. तो मरण पावला होता. बश्किर लोकांना अतीव दु:ख झालं. पखोमच्या नोकरानं कुदळ घेऊन धन्यासाठी एक कबर खोदली. पखोमचं शरीर जमिनीवर जितक्या लांबीरुंदीचं होतं तितक्याच आकाराची ती कबर होती.

लियो टॉलस्टॉय (१८२८-१९१०)

लिओ टॉलस्टॉय हा जगप्रसिध्द लेखकांपैकी महत्वाचा लेखक. वॉर अँड पीस, ॲना करेनिना आणि रिसरेक्शन या त्याच्या साहित्यकृती लोकप्रिय आहेत. टॉलस्टॉयनं असंख्य कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या. आयुष्याच्या अखेरच्या काळात तो धार्मिक आणि राजकीय लिखाणाकडे वळला.

लेव (लिओ) निकोलायविच टॉलस्टॉय हा निकोलाईच टॉलस्टॉय आणि एक धनाढ्य राजपुत्राची मुलगी, मारिया व्होल्कनस्काया या दांपत्याच्या पाच अपत्यांपैकी दुसरा मुलगा. त्याचा जन्म २८ ऑगस्ट १८२८ रोजी कुटुंबाच्या यास्नाया पोल्याना या भल्यामोठ्या इस्टेटीवर झाला. त्याचे आईवडील लवकर मरण पावल्यामुळे त्याची मावशी यास्नाया हिनं लिओ आणि त्याच्या भावंडांचा सांभाळ केला. रशियातल्या उंची घराण्यात जन्म घेतलेल्या इतर मुलांप्रमाणेच त्यांचं शिक्षण घरीच झालं आणि बालपण ग्रामीण विभागातलं मुक्त आयुष्य उपभोगण्यात गेलं.

टॉलस्टॉयनं कायद्याचं शिक्षण नंतरच्या काळात कझान विद्यापीठात घ्यायला सुरुवात केली. तीन वर्षांनंतर अभ्यास सोडून तो यास्नाया इस्टेटीवर परतला. ती इस्टेट त्यालाच वारसाहक्कानं मिळणार होती. त्याला प्रागतिक जमीनदार व्हायचं होतं आणि भूदासांचं आयुष्य सुकर करण्यासाठी त्याच्या मनात अनेक कल्पना होत्या. पण त्याच्या कल्पना भूदासांना समजत नसल्यानं तो निराश होऊन मॉस्कोला गेला.



१८५१ साली लिओ आणि त्याचा भाऊ रशियन लष्करात भरती होऊन कॉकेशसला गेले. कोसॅक्स लोकांचं साधंसुधं आयुष्य त्याला तिथे अनुभवायला मिळालं. त्याच्या नंतरच्या अनेक कथांमध्ये ते प्रतीत होतं. १८५४च्या शेवटी तो गाजलेल्या फोर्थ क्रिमिअन बॅशनमध्ये सेबॅस्टोपोलच्या संरक्षणासाठी सामील झाला होता. सेबॅस्टोपोलच्या तीन युध्दकथांमुळे तो रशियात गाजला. १८५६ साली लष्करातून निवृत्त झाल्यावर टॉलस्टॉय इस्टेटीवर परतला. भूदासांना त्याला मुक्त करायचं होतं. पण परत एकदा त्यांचा विश्वास प्राप्त करण्यात तो असमर्थ ठरला. युरोपियन देशांत एक दीर्घ दौरा करुन आल्यानंतर त्यानं भूदासांच्या मुलांसाठी एक शाळा काढली. तिथे त्यानं मुलांना मुक्त विचारांना प्राधान्य देणारं पर्यायी शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती.

१८६२ साली त्याचं सोफिया आंद्रेव्हिनाबर्स या एका डॉक्टरच्या मुलीबरोबर लग्न झालं. तिच्यापासून त्याला १३ मुलं झाली पण त्यांचं वैवाहिक आयुष्य सुखाचं नव्हतं. आयुष्याच्या उत्तरार्धात टॉलस्टॉयनं साहित्याकडे दुर्लक्ष करुन अध्यात्मिकतेपणे लक्ष दिलं. चर्चची शिकवण अमान्य करुन स्वतःचा एक विचारपंथ त्यानं सुरु केला. त्यानं सुखोपभोगांचा, सर्व चंगळवादी वस्तूंचा त्याग केला. इस्टेट बायकोच्या नावावर केली आणि १९०१ साली नोबेल पारितोषिकही चक्क नाकारलं.

१८७८ साली इव्हान टर्जेनिव्ह हा रशियन लेखक टॉलस्टॉयला भेटला आणि टॉलस्टॉयनं लेखनाकडे वळावं अशी त्याला विनंती केली. १८८३ साली मृत्यूशय्येवर असताना टर्जेनिव्हनं टॉलस्टॉयला एक पत्र लिहिलं. त्यात त्यानं रशियातल्या सर्वश्रेष्ठ लेखकानं साहित्याकडे परत फिरावं असं सुचवलं होतं. १८८४ साली टॉलस्टॉयनं परत एकदा साहित्यनिर्मिती सुरु केली. अध्यात्मिक गोष्टींचा अवलंब चालूच होता. त्यानं दर्जेदार पुस्तकं स्वस्तात उपलब्ध करुन देण्यासाठी एक प्रकाशनसंस्था काढली.

१८९१ साली टॉलस्टॉयनं आपल्या साहित्याचे कॉपीराईटस सोडून दिले. मुलांचा विचार करता सोफियाला ती कृती अनाकलनीय वाटली आणि मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाचा विचार करता, कॉपीराईटस राखण्याबाबत त्यांच्यात वाद झाले. टॉलस्टॉय आणि सोफिया यांच्यातले संबंध तणावाचेच राहिले. २८ ऑक्टोबर १९१० रोजी टॉलस्टॉयनं यास्नाया पोल्याना ही इस्टेट सोडली. थोड्याच दिवसांनी ७ नोव्हेंबरला हा जागतिक कीर्तीचा साहित्यिक फुफुसांच्या विकारानं मरण पावला.



१८८६ साली लिओ टॉलस्टॉयनं लिहिलेली मुलांना समजेल अशा संक्षिप्त स्वरुपातली पखोम या लोभी शेतकऱ्याची कथा. पखोमला आरोग्य आणि कुटुंबियांचा आनंद महत्वाचा वाटतो, पण तरीही त्याला आपल्या सासूसासऱ्यांची संपत्ती मोह पाडते. तो जास्त जमीन मिळवण्यासाठी नवनवीन साहसं करतो पण दरवेळेला नवीन समस्या समोर ठाकते. अखेरीस, पखोमला नजरेआड करता न येण्याजोगी एक संधी दिसते आणि तो बश्किरपर्यंत मजल मारतो. तिथे त्याला दिवसभरात चालताना पायाखाली असलेली सर्व जमीन मिळणार असते.

